आजचा सुविचार

काळा रंग हा अशुभ समजला जातो.

पण प्रत्येक काळा रंगाचा

फळा हा अनेक विद्यार्थांचे

आयुष्य उजलवत असतो...

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...

आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २३६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०८ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## ढग परतले! अवकाळीनंतर महाराष्ट्राला दिलासा, केवळ विदर्भात 'यलो अलर्ट'



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** गेले काही दिवस अवकाळी पावसानं जिल्ह्याला झोडपलं असताना नागरिकांना आता दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

येत्या काही दिवसांत अनेक भागांत ढगाळ वातावरण असलं तरी पावसाची शक्यता कमी आहे. विदर्भातील काही भागांत फक्त हलक्या सरींचा पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे राज्यात हवामान प्रामुख्याने कोरडं राहण्याची शक्यता आहे.

**कोणत्या जिल्ह्यांना यलो अलर्ट?**

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील काही जिल्ह्यात अजूनही अवकाळी पावसाचं संकट कायम आहे. त्यामुळे चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना ७ एप्रिल रोजी यलो अलर्ट देण्यात आला आहे. यावेळी वादळी वाऱ्यांसह हलक्या पावसाची शक्यता आहे. राज्यातील उर्वरित भागांत वातावरण कोरडं राहील. दरम्यान, धुळे, नंदूरबार, नाशिक आणि नाशिकधील घाट परिसरातही हलक्या सरींची शक्यता आहे. दरम्यान, मुंबई, ठाणे, पालघरमध्ये दिवसभर ढगाळ वातावरण असेल. यामुळे उन्हाचा तडाखा कमी जाणवण्याची शक्यता आहे.

याउलट, काही जिल्ह्यातील तापमान पुन्हा वाढायला सुरूवात झाली आहे. नागपूर, अमरावती, अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे. या भागांमध्ये आज किमान तापमान २४ ते २७ अंश सेल्सिअस दरम्यान असण्याची शक्यता आहे. तसेच, कमाल तापमानाचा पारा ३८ ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्यची शक्यता आहे. या ऊन-पावसाच्या सततच्या खेळामुळे राज्यातील नागरिक त्रस्त झाले आहेत.

**कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील हवामान...**

कोकण किनारपट्टीनर हवामान उष्ण आणि दमट राहण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये किमान तापमान २४ ते २६ अंश सेल्सिअस तर कमाल तापमान ३२ ते ३५ अंश सेल्सिअस असण्याची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्येही पावासाची शक्यता कमी आहे. कमाल तपामान ३४ ते ३८ अंश सेल्सिअस दरम्यान राहील.

**मराठवाड्यात उष्णतेची लाट**

दरम्यान, मराठवाड्यातही उष्णतेची लाट पुन्हा येण्याची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव, परभणी आणि नांदेड जिल्ह्यांमध्ये ७ एप्रिल रोजी तापमान ३६ ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. तसेच, काही भागांत तापमान सातत्याने ४० अंश सेल्सिअसच्या आसपास राहील.

## मुंबईत आज रिक्षा चालकांचे आंदोलन



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०७, मुंबई :** राज्यात जवळपास वर्षभरापूर्वी सुरु करण्यात आलेल्या चालक कल्याण योजनेत नोंदणी करण्यासाठी, प्रत्येक चालकाला ५०० रुपये प्रवेश शुल्क आणि ३०० रुपये वार्षिक शुल्क असे एकूण ८०० रुपये सुरुवातीलाच भरावे लागतात.

कामगार संघटनांच्या नेत्यांनी याचा निषेध केला आहे. ही पद्धत सक्तीची असल्याची टीका त्यांनी केली आहे. अत्यावश्यक सेवांचा लाभ घेण्यासाठी कोणत्याही चालकावर कल्याण शुल्क भरण्याची सक्ती केली जाऊ नये अशी मागणी त्यांनी केली आहे.

महाराष्ट्रामध्ये अंदाजे १५ लाख रिक्षाचालक आहेत. ही संख्या पाहता शुल्काच्या माध्यमातून सरकारला सुमारे १२० कोटी रुपये मिळतील, असा अंदाज संघटनांनी व्यक्त केला आहे. या आकड्यांमुळेच या योजनेचा मूळ उद्देश नेमका काय आहे, याविषयीचा संशय अधिकच बळावला आहे.

दरम्यान आपल्या दैनंदिन प्रवासासाठी रिक्षावर अवलंबून असणाऱ्यांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. सकाळी कामावर किंवा शाळेत जाताना अचानक रिक्षासाठी धावपळ करावी लागू शकते. त्यामुळे आधीच पर्यायी व्यवस्था ठेवणं सोयीचं ठरेल.

कामगार संघटनांच्या नेत्यांनी इशारा दिला आहे की, या आंदोलनामुळे विशेषतः उपनगरीय भागांमध्ये रिक्षांच्या उपलब्धतेवर मोठा परिणाम होऊ शकतो.

प्रवास सुरळीत व्हावा यासाठी, प्रवाशांना कॅब, बेस्ट बस किंवा मेट्रो यांसारख्या वाहतुकीच्या पर्यायी साधनांचा विचार करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

## १५ जिलेटीन कांड्या, ५८ डिटोनेटर, नागपुरात संवेदनशील भागात विस्फोटकांचा साठा सापडला



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, नागपूर :** नागपूर शहरातील सीए रोड परिसरात मोठ्या प्रमाणात जिवंत विस्फोटक आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. गणेशपेठ पोलीस स्टेशन हद्दीतील दोसर भवन चौकात, मेट्रो स्टेशनच्या अगदी शेजारी आणि अत्यंत संवेदनशील भागात ही घटना उघडकीस आली. आज सकाळी एका घराच्या परिसरात संशयास्पद बॅग असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर ही धक्कादायक बाब समोर आली.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित बॅगमध्ये तब्बल १५ जिलेटीन कांड्या, ५८ डिटोनेटर आणि ८ कनेक्टर आढळून आले. ही बॅग गेल्या एक ते दीड महिन्यांपासून त्या ठिकाणी पडून असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे. आज सकाळी त्या बॅगमधील जिलेटीन कांड्या बाहेर दिसू लागल्यामुळे घरमालकाच्या लक्षात हा प्रकार आला आणि त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली.

याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांसह बॉम्ब शोधक आणि नाशक पथक (BDDS) दाखल झाले. त्यांनी तात्काळ परिसर सील करून शोधमोहीम राबवली. तपासादरम्यान सर्व विस्फोटक साहित्य सुरक्षितपणे जप्त करण्यात आले असून ते पुढील तपासासाठी अज्ञात स्थळी हलविण्यात आले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

**जामा मशिद, राम मंदिर, RSS मुख्यालयाच्या जवळ स्फोटकांचा साठा**

विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हा साठा आढळला तो परिसर अत्यंत संवेदनशील मानला जातो. घटनास्थळापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर जामा मशिद, ५०० मीटरवर पोद्दारेश्वर राम मंदिर आणि दीड ते दोन किलोमीटर अंतरावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय आहे. त्यामुळे या घटनेचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

दरम्यान, प्राथमिक तपासात नागपूर जिल्ह्यातील काटोल परिसरातील एसबीएल कंपनीत झालेल्या स्फोटाशी या विस्फोटकांचा संबंध असल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. संबंधित कंपनीतील स्फोटक साहित्य बेवारस अवस्थेत येथे आणून टाकण्यात आले असावे, असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मात्र, याबाबत अद्याप अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही. पोलिस उपायुक्त राहुल मदने यांनी सांगितले की, घटनास्थळावरून आढळलेले सर्व साहित्य सुरक्षित करण्यात आले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, हे विस्फोटक येथे कोणी आणि कोणत्या उद्देशाने ठेवले याचा शोध घेतला जात आहे. तसेच, सीसीटीव्ही फुटेज आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे संशयितांचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले असून, कोणतीही संशयास्पद वस्तू दिसल्यास तात्काळ पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शेतात गवत कापत असताना सर्पदंश
## देवगावच्या शेतकऱ्याचा मृत्यू

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०७, विंचूर (नाशिक) :** निफाड तालुक्यातील देवगाव येथील महादेवनगर परिसरात एका ५३ वर्षीय शेतकऱ्याचा सर्पदंशामुळे मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना आज सकाळी घडली. प्रशांत एलजी सोनवणे (वय ५३) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रशांत सोनवणे हे आज मंगळवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास आपल्या शेतात गवत कापत होते. काम करत असताना त्यांच्या उजव्या पायाच्या अंगठ्याला विषारी सापाने दंश केला. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी त्यांना तातडीने उपचारासाठी हलवले. उपचारापूर्वीच प्राणज्योत मालवली सोनवणे यांना सकाळी ११ वाजेच्या सुमारास लासलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल राठोड यांनी त्यांची तपासणी केली असता, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

पोलीस तपास सुरू या घटनेबाबत मृताचे पुत्र साई प्रशांत सोनवणे यांनी माहिती दिली. याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात सीसीटीएनएस अकस्मात मृत्यू नोंद क्र. २३/२०२६ नुसार, भारतीय नागरी सुरक्षा कायदा २०२३ च्या कलम १९४ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संदीप शिंदे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. ऐन शेतीच्या कामांच्या दिवसात घडलेल्या या घटनेमुळे देवगाव परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

## माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०७, मुंबई :** जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठराविक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

## राज्यातील ११ बड्या IAS अधिकाऱ्यांची बदली




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** राज्यात प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे सात दिवसांपूर्वीच राज्य शासनाने प्रशासनातील बड्या अधिकाऱ्यांची बदली केली होती. IAS अश्विनी भिडे यांची मुंबई महापालिका आयुक्त पदी नियुक्ती केली होती. तसेच IAS तुकाराम मुंढे यांची देखील बदली करण्यात आल्याचं वृत्त समोर आलं होतं.

त्यानंतर सात दिवसांनी आज पुन्हा एकदा राज्यातील ११ वरिष्ठ पातळीवरच्या IAS अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. पुणे येथे कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक राहुल रंजन महीवाल यांची बदली करण्यात आली आहे. पुणे येथे महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या सदस्य सचिव म्हणून IAS राहुल रंजन महीवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

IAS श्वेता सिंघल नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे विशेष निवासी आयुक्त या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तर IAS रुचेश जैवंशी यांची महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे येथे व्यवस्थापकीय संचालक पदी नियुक्ती करण्यात आली आहे. खअड कन्हुराज बागटे यांची कल्याण येथे महावितरणाच्या (MAHADISCOM) संयुक्त व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई येथे सचिवपदी कार्यरत असलेले IAS लक्ष्मण राऊत यांची देखील बदली करण्यात आली आहे. लक्ष्मण राऊत यांची नियुक्ती मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई येथे करण्यात आली आहे. तर तिथे कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी गीतांजली बाविस्कर यांची मुंबईत मंत्रालयातील नियोजन विभागात सहसचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

कल्याण येथील महावितरणाचे संयुक्त व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप जगदाळे यांची मुंबईत मंत्रालयात बदली करण्यात आली आहे. त्यांची मंत्रालयाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात सहसचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे. दुसरीकडे IAS पंकज देवरे यांची महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई येथे सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे.




## भारत - नेपाळ संबंध सुधारतील?

नेपाळ हा भारताचा शेजारी देश असून भारताच्या मित्र देशांपैकी एक देश आहे. भारत आणि नेपाळची संस्कृतीही जवळपास सारखीच आहे. जगातील एकमेव हिंदू देश अशी नेपाळची ओळख आहे. भारततही बहुसंख्य हिंदुधर्मीय लोक असून भारताचा सर्वाधिक विश्वासार्ह देश अशी नेपाळची ओळख आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच नेपाळशी आपले मैत्रीचे आणि सौहार्दाचे संबंध राहिले आहेत. भारत आणि नेपाळ यांच्या दरम्यानची सीमारेषाही आपण मुक्त केली आहे म्हणजे नेपाळमधील कोणताही नागरिक व्हिसा शिवाय भारतात प्रवेश करू शकतो तसेच भारतात व्यवसायही करू शकतो. नेपाळचे लाखो नागरिक आज भारतात वास्तव्य करून आहेत. दोन्ही देशात रोटीबेटीचा व्यवहार देखील होतो असे असले तरी तरी गेल्या काही वर्षात नेपाळ आणि भारतात प्रचंड कटुता निर्माण झाली आहे. दोन्ही देशातील सौहार्दपूर्ण संबंध बिघडले आहेत. एकेकाळी भारताला सच्चा मित्र मानणारा नेपाळ आता भारताला स्पर्धक समजू लागला आहे. इतकेच नाही तर भारताचा भूभाग आपल्या नकाशात दाखवून भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान देऊ लागला आहे. के पी ओली शर्मा नावाचे गृहस्थ जेंव्हा नेपाळचे पंतप्रधान बनले तेव्हापासून दोन्ही देशातील कटुता वाढत गेली. के पी ओली शर्मा हे नेपाळचे पंतप्रधान बनल्यावर त्यांनी भारताशी असलेले सौहार्दाचे संबंध तोडून टाकले आणि भारताला आपला प्रतिस्पर्धी म्हणून घोषित केले अर्थात याला चीन जबाबदार आहे. के पी ओली शर्मा चीन धार्जिणे होते. चीनच्या नादी लागून त्यांनी भारताच्या सतत खोड्या काढण्याचा उद्योग केला. कधी त्यांनी भारताचा भूभाग नेपाळच्या नकाशात दाखवला तर कधी नेपाळच्या चलनी नोटांवर भारताचा भूभाग छापून भारताला चिथावले. अर्थात हा सर्व चीनच्या रणनीतीचा भाग होता. भारताच्या शेजारी असलेल्या देशांना साम, दाम, दंड, भेद या मार्गाचा वापर करून भारताविरुद्ध फितवायचे आणि स्वतःकडे वळवायचे आणि त्याद्वारे भारतावर दबाव आणायचा ही रणनीती होती अर्थात आजही ती आहे याच रणनितीला के पी ओली शर्मा हे बळी पडले आणि त्यांनी भारताला थेट आव्हान दिले त्यामुळे दोन्ही देशात कटुता निर्माण झाली. आता मात्र चित्र बदलत आहे कारण चीन धार्जिणे के पी ओली शर्मा यांच्या भ्रष्ट कारभाराविरोधात नेपाळच्या जेन झी ने मागील वर्षी मोठा उठाव केला त्यात के पी ओली शर्मा यांना आपली खुर्ची सोडावी लागली. के पी ओली शर्मा पदभ्रष्ट झाल्यानंतर नेपाळमध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकीत ३५ वर्षाच्या बालेंद्र शहा उर्फ बालेन या तरुणाच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने (आर एस पी) बहुमत मिळवले आणि त्यांच्या पक्षाने बालेंद्र शहा यांची नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून घोषणा केली. राम नवमीच्या मुहूर्तावर बालेंद्र शहा यांनी नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. बालेंद्र शहा यांनी नेपाळची सूत्रे हाती घेतल्यामुळे भारत आणि यांच्यातील संबंध पूर्वीप्रमाणे सौहार्दाचे होतील अशी आशा निर्माण झाली आहे कारण पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतल्या पासून त्यांनी भारताविरुद्ध एकही वक्तव्य केले नाही अर्थात काठमांडूचे महापौर असताना त्यांनी भारत विरोधी भूमिका घेत ग्रेटर नेपाळचे समर्थन करत भारताला दुखावले होते आता मात्र त्यांची ती भूमिका बदलेल अशी आशा करायला हरकत नाही कारण बालेंद्र शहा पंतप्रधान बनल्यावर आपल्या पतप्रधानांनी त्यांचे अभिनंदन केले त्यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत दोन्ही देशात मैत्रीचे संबंध निर्माण होतील अशी ग्वाही दिली. अर्थात त्यांच्याकडून तशी अपेक्षा करायला हरकत नाही कारण बालेंद्र शहा आणि आपले खूप जवळचे संबंध आहेत. बालेंद्र शहा यांचे शिक्षण भारतातच झाले आहे. त्यांनी बंगळुरूच्या विश्वेशरय्या युनिव्हर्सिटीमधून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले आहे. त्यांची एक बहीण बंगळुरूमध्येच राहते त्यामुळे भारताबाबत त्यांच्या मनात निश्चितच आदर असेल. अर्थात त्यांच्या मनात चीनबद्दल असलेले आकर्षण लपून राहिले नाही असे असले तरी पंतप्रधान म्हणून ते चीनच्या कच्छपी लागणार नाहीत अशी आशा करूया. भारतानेही याबाबत कुटनितीक पावले टाकून बालेंद्र शहा यांना भारताकडे वळवण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लवकरात लवकर नेपाळचा दौरा करून बालेंद्र शहा यांची भेट घ्यावी त्यामुळे दोन्ही देशात बिघडलेले संबंध पूर्ववत होतील आणि दोन्ही देशात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील.

**- श्याम ठाणेदार**

# चक्रवर्ती सम्राट अशोक

भारतीय इतिहासातील सुवर्णपानांमध्ये ज्यांचे नाव अजरामर झाले आहे, अशा महान सम्राटांमध्ये सम्राट अशोक यांचे स्थान सर्वोच्च आहे. मौर्य साम्राज्य चे तिसरे शासक होते.सम्राट अशोकांचा जन्म इ.स.पूर्व ३०४ च्या सुमारास पाटलिपुत्र.. (आजचा पाटणा) येथे झाला. ते बिंदुसार यांचे पुत्र आणि महान शासक चंद्रगुप्त मौर्य यांचे नातू होते. चंद्रगुप्त मौर्य यांना अनेक राण्या होत्या. त्यातील 'धर्मा' ही अशोकांची आई होती. अनेक भावंडामध्ये

त्यांचा शेवटून दुसरा नंबर होता, त्यामुळे तो कधी चक्रवर्ती बनू शकेल असे कोणालाच वाटतं नव्हते. पण अगदी लहानपणापासूनच अशोक धाडसी, बुद्धिमान आणि कठोर स्वभावाचे होते. युद्धकला, घोडेस्वारी, राजकारण आणि प्रशासन यांचे शिक्षण त्यांनी घेतले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात नेतृत्व, निर्णयक्षमता आणि धैर्य हे गुण स्पष्ट दिसत होते. सर्वांत धाडसी,निपुण आणि जिद्दी असल्यामुळे तरुणपणीच त्याच्यातील हे गुण ओळखून चंद्रगुप्ताने त्याच्यावर कलिंग देशावर आक्रमण करून लढण्यासाठी त्याची निवड केली,आणि ती मोहीम त्याने अगदी चुटकीसरशी फत्ते पण केली. त्या नंतरही असंख्य लढाया करून सर्वांत यश प्राप्त केले.अशोकांना तरुण वयातच विविध प्रांतांचे राज्यपाल म्हणून पाठवण्यात आले. त्यांनी तक्षशिला व उज्जैन येथे प्रशासकीय कामे पाहिली.

त्याच्या या पराक्रमावर, यशावर त्याचे सगळे बंधू साहजिकच त्यांचा अधिकार डावलला गेल्यामुळे चिडले होते. त्यांचा सर्वांत मोठा भाऊ सुसीम हा तर खूपच विरोधात होता. त्याला अडथळे आणण्यासाठी वेळोवेळी मोठे उठाव घडवून आणले जात असत. सम्राट अशोकांना अनेक पत्नी होत्या, ज्यामध्ये प्रामुख्याने महारानी देवी, कारुवाकी (कौरवाकी), असंधिमित्रा, पद्मावती आणि तिष्यरक्षिता यांचा समावेश आहे.

बिंदुसार यांच्या मृत्यूनंतर सिंहासनासाठी त्यांच्या पुत्रांमध्ये संघर्ष झाला. या संघर्षात अशोकांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करून इ.स.पूर्व २६८मध्ये सत्ता मिळवली. त्याला अडथळे आणण्यासाठी त्यांच्यावर संतापलेली भावंडे वेळोवेळी मोठे उठाव घडवून आणत असत. पण त्यावरही दुर्लक्ष करत,त्यावर मात करत ते मोहिमा फत्ते करतच होते. शेवटी तर सुसीमने कहरच केला. त्याने त्याच्यावर प्राणघातक हल्ला केला.त्यात त्याच्या आईलाही मृत्यू आला. मग अशोक पण संतापले आणि त्यांनी सर्व भावंडाना ठार मारले. या त्याच्या हिस्त्र रूपामुळे त्याला त्या काळात 'चंडअशोक' म्हणून ओळखू लागले. पुढे अनेक युद्धे केली आणि अजिंक्य म्हणून ओळख निर्माण केली. त्याला खूपच अहंकार निर्माण झाला आणि त्यातून त्यांची राज्यविस्ताराची महत्वाकांक्षा तीव्र झाली. त्यासाठी त्यांनी असंख्य लढाया केल्या.

४० वर्षाच्या त्यांच्या राज्यकारभाराच्या कारकिर्दीत त्यांनी अखंड भारताचा बहुतांश भाग तर काबीज केलाच होता, पण त्याचबरोबर इराण, इराक, म्हैसूर, बांगलादेश, आसाम, अफगाणिस्तान पर्यंत बऱ्याच देशांच्या सीमांपर्यंत राज्याचा विस्तार केला होता. हे त्या काळातील जगातील सर्वात मोठ्या साम्राज्यांपैकी एक होते.म्हणूनच त्यांना सम्राटांचा सम्राट म्हणजेच सर्वांत मोठ्या राजांचा राजा म्हणून आदराने ओळखले जाते. म्हणूनच 'चक्रवर्ती सम्राट अशोक' ही त्यांनी स्वतःच्या कर्तुत्ववाने मिळवलेली ओळख निर्माण झाली. अशोकांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे कलिंग युद्ध. या युद्धात हजारो लोक मारले गेले आणि मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. हे पाहून अशोकांच्या मनात खूप पश्चात्ताप निर्माण झाला. प्रचंड जीवितहानी,रक्तांचे पाट,मासांचा चिखल, प्रेतांचा खच पाहून, सडलेली प्रेते, उजाड, बेचिराख झालेली गावे, उध्वस्त घरे, हा संहार पाहून त्यांचे मन खूपच विदीर्ण झाले. आणि म्हणूनच त्याच क्षणी त्यांना वाटले, हा आपला विजय आहे की पराजय? इतकी हिंसा करून मी काय मिळवले? यात कसला आहे पुरुषार्थ? त्याच क्षणी त्यांनी हिंसाचार थांबवण्याचे ठरवले आणि बौद्ध धर्म स्वीकारला. अशोकांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत शांतता व धर्माचा प्रसार केला. आधीचे सम्राट चक्रवर्ती अशोक आणि बौद्धधर्म स्वीकारल्यानंतरचे अशोक यात जमीन अस्मानाचा फरक होता.अक्षरशः वाल्या कोळ्याचे वाल्मिकी ऋषी मध्ये रूपांतर झाले होते तसेच झाले.ते स्वतः बौद्ध धर्माचा प्रसारक म्हणून कार्य करू लागले.अशोकांनी बौद्ध धर्माचा प्रसार भारतातच नाही, तर भारताबाहेरही केला.

श्रीलंका, नेपाळ,अफगाणिस्तान,म्यानमार येथे धर्मप्रचार केला.त्यांनी धम्म (नैतिक जीवन) ही संकल्पना विकसित केली.

धम्माची मुख्य तत्त्वे म्हणजे..अहिंसा म्हणजेच कोणत्याही प्राण्यांची शिकार अथवा हत्या करायची नाही.

सत्य व प्रामाणिकपणा.. नेहमी खरे बोलणे, सत्याने वागणे. सर्व प्राणिमात्रांत अहिंसा,दया, धार्मिक सहिष्णुता ,पालक व गुरुंचा आदर करणे, प्रजेच्याकल्याणाची भावनाही आहेत.

अशोकांचा धम्म हा कोणत्याही एका धर्मापुरता मर्यादित नव्हता, तर तो सर्व मानवांसाठी नैतिक जीवनाचा मार्ग होता. त्यांचा पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवल्यामुळे बौद्ध धर्म आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचला. सम्राटअशोकांनी



आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी अनेक शिलालेख आणि स्तंभ उभारले. भारताच्या राष्ट्रध्वजातील अशोक चक्र त्यांच्या न्याय व धर्माचे प्रतीक आहे.सारनाथचा सिंहस्तंभ भारताचे राष्ट्रीय चिन्ह आहे.

त्यांच्या विचारांचा प्रभाव महात्मा गांधींसारख्या नेत्यांवरही पडला. ब्राह्मी आणि खरोष्टी लिपीत लेखन केलेले आजही अस्तित्वात आहेत. सम्राट अशोक हे इतिहासातील अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी लोकोपकाराची असंख्य कामे केली.म्हणून त्यांना 'लोकहीतवादी सम्राट'

असेही ओळखत असत. अशोक , सम्राट अशोक,चक्रवर्ती सम्राट अशोक, महान अशोक, देवानांप्रिय, प्रियदर्शी , चंडशोक, 'देवानांप्रिय प्रियदर्शी' या नावानी पण त्यांना ओळखले जाते. सम्राट अशोक हे केवळ एक पराक्रमी राजा नव्हते, तर एक दयाळू आणि मानवतावादी शासक होते. अशोकांनी न्यायव्यवस्थेत पारदर्शकता आणली. त्यांनी धम्म महामात्र नावाचे अधिकारी नेमले, जे जनतेच्या तक्रारी ऐकत असत. त्यानी राज्यात अनेक लोककल्याणकारी योजना आखल्या आणि आमलात पण आणल्या.राज्यात अनेक उत्तम रस्ते, नाले, विहिरी आणि बागा बांधल्याप्रवाशांसाठी विश्रामगृहे उभारली.मानव व प्राण्यांसाठी रुग्णालये बांधली. रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावली. त्यांनी राज्यातील करप्रणाली सुलभ केली

प्रजेला न्याय्य वागणूक दिली. सर्व जाती वर्गातील लोकांना समान अधिकार दिले. आणि हे इतिहासाचा महत्त्वाचा स्रोत आहेत. त्यांनी शिक्षा झालेल्या तुरुंगातील कैद्यांना सुद्धा सहिष्णूता दाखवली. गुणी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची उत्तम सोय केली. अनेक विद्यापीठे बांधली. शेतीसाठी

पाण्याचे कालवे बांधले.अनेक स्तूप,विहार बांधले. सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर भारत आणि मौर्य साम्राज्याने सर्वच बाबतीत – राजकीय स्थैर्य, आर्थिक समृद्धी, सामाजिक सुधारणा, कला, शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय संबंध यामध्ये प्रचंड भरभराट साधली. त्याच्या शांततेच्या आणि धर्माधिष्ठित राजकारणामुळे भारताच्या संस्कृतीचा प्रभाव पूर्ण आशिया खंडात पसरला, आणि आजही त्याचे विचार भारताच्या राष्ट्रीय जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. मध्यप्रदेशातील सांची येथील अशोकस्तंभ हे जगप्रसिद्ध आहेत. त्यांची शिकवण सर्वांसाठी खूपच मोलाची आहे. अहिंसा, शांती, सहिष्णूता, दयाभाव, मोठ्यांच्या प्रती आदरभाव, ही त्यांची महत्वाची आदर्श तत्वे आहेत. अशोक हे केवळ पराक्रमी नव्हते, तर ते एक विचारवंत आणि मानवतावादी शासक होते. दूरदृष्टी, करुणा, न्यायप्रियता,धार्मिक सहिष्णुता, लोककल्याणाची भावना हे त्यांच्यातील उत्तम गुण होते. प्रजा ही माझी मुले आहेत. असे ते म्हणत असत.

अशोकांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत शांतता व धर्माचा प्रसार केला.इ.स.पूर्व २३२ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर मौर्य साम्राज्य हळूहळू कमकुवत झाले.

आपला भारत देश याच विचारांनी प्रभावीत आहे. म्हणूनच तो संस्कृतीप्रधान म्हणून ओळखला जातो.आजच्या काळातही त्यांच्या विचारांची गरज तितकीच महत्त्वाची आहे.

आज अमेरिका,इराण ,इराक ,इस्त्रायला अशा मोठ्या देशात भीषण युद्धे सुरु असताना, भारताने मात्र शांत, संयमी, सहिष्णुतेची भूमिका घेतली आहे.

युद्धाचे भयंकर दुष्परिणाम अगदी सामान्य नागरिकानाही भोगावे लागतात.

त्यामुळे अमेरिकासारखा बलाढ्य, ताकदिचा देश आणि इराण सारखा लढवय्या देश यांनाही आतून आता हे युद्ध थांबले पाहिजे असे वाटत आहे. युद्धाच्या दुष्परिणामांचे गांभीर्य ओळखून अगदी विचारपूर्वक योग्य धोरणे आखून, भारत आपल्या मित्र राष्ट्रासह बाकीच्याराष्ट्राशीही मैत्रीचे संबंध जोपासत आहे. हे देश आपल्या भारताने मध्यस्थी करावी यासाठी आशेने पहात आहेत. कारण भारतच हे करू शकेल अशी त्यांना आशा वाटते. ही भारतासाठी खूपअभिमानांची गोष्ट आहे. युद्धामुळे झालेली कलिंगाची परिस्थिती , युद्धानंतर झालेली विदारक अवस्था यांची पुनराव्रुत्ती आता होऊ नये अशीच सर्वांची इच्छा आहे. आणि युद्धानंतर जशी शांतता, अहिंसा अशोकांच्या आदर्श विचारांच्या प्रभावाने झाली,तशी पुन्हा कायम राहावी हिच इच्छा सर्वांचीच आहे. म्हणूनच सम्राट अशोकांच्या आदर्श तत्वांचा सर्वांनी अंगीकार करून वाटचाल केल्यास सर्वांचे कल्याण होईल. अशोकांच्या शांततेच्या पुरस्काराचा भारताच्या सांस्कृतिक, धार्मिक आणि सामाजिक बांधणीवर कायमचा प्रभाव पडलेला आहे. म्हणूनच कायम अशोकांचे नाव वंदनीय आहे आणि त्यांचा वारसा जगभरातील लोकांना प्रेरणा देत आहे.

**- सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.**

# सुदृढ आरोग्य : समृद्ध जीवनाचा पाया!

दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगभरात 'जागतिक आरोग्य दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक साजरा करण्याचा नसून, मानवजातीसमोर उभ्या असलेल्या आरोग्यविषयक प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्याचा, आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा आणि प्रत्येक व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाची प्रगती झपाट्याने होत असताना, आरोग्याच्या क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल झाले असले तरीही अनेक नवीन आव्हानेही समोर आली आहेत. त्यामुळे 'आरोग्य' हा विषय केवळ वैयक्तिक न राहता सामाजिक, आर्थिक आणि जागतिक पातळीवर अत्यंत महत्त्वाचा बनला आहे.

आरोग्य म्हणजे केवळ आजार नसणे नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या पूर्णपणे सुदृढ असणे ही त्याची व्यापक संकल्पना आहे. अनेकदा आपण आरोग्याचा विचार फक्त शरीराशी संबंधित करतो, परंतु मानसिक आरोग्य, सामाजिक वातावरण, जीवनशैली, आहार, पर्यावरण आणि आर्थिक परिस्थिती यांचा आरोग्यावर मोठा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, ताणतणाव, असंतुलित जीवनशैली, अपुरी झोप, व्यसनाधीनता आणि चुकीचा आहार यामुळे अनेक आजार निर्माण होतात. त्यामुळे आरोग्याचा विचार करताना सर्वसमावेशक दृष्टीकोन आवश्यक आहे.

आजच्या आधुनिक जीवनशैलीत बदलांमुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. शहरीकरण, औद्योगिकीकरण, प्रदूषण आणि वाढती स्पर्धा यामुळे माणूस अधिक तणावग्रस्त बनत आहे. फास्टफूड संस्कृती, शारीरिक हालचालींचा अभाव, तंत्रज्ञानावर अवलंबित्व यामुळे मधुमेह, हृदयविकार, स्थूलता, रक्तदाब यांसारख्या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. ग्रामीण भागातही परिस्थिती वेगळी नाही. तेथे आरोग्यसेवेचा अभाव, पोषणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि आर्थिक अडचणी यामुळे विविध आजार पसरतात.

महिलांचे आरोग्य हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि दुर्लक्षित विषय आहे. अनेक ठिकाणी महिलांना योग्य पोषण मिळत नाही, गर्भधारणेदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा मिळत नाहीत आणि सामाजिक बंधनांमुळे त्यांचे आरोग्य दुर्लक्षित राहते. त्यामुळे मातामृत्यू आणि बालमृत्यू दर वाढतो. महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, त्यांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे आणि त्यांना सशक्त बनवणे ही काळाची गरज आहे.

बालकांचे आरोग्य हा समाजाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. कुपोषण, लसीकरणाचा अभाव, स्वच्छतेची कमतरता आणि शिक्षणाचा अभाव यामुळे बालकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. बालकांना योग्य आहार, स्वच्छता, शिक्षण आणि आरोग्यसेवा दिल्यास त्यांचे सर्वांगीण विकास साधता येतो. यासाठी पालक, शिक्षक आणि शासन यांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील एक गंभीर प्रश्न बनला आहे. ताण, चिंता, नैराश्य, एकाकीपणा आणि स्पर्धेचा दबाव यामुळे अनेक लोक मानसिक समस्यांना सामोरे जात आहेत. विशेषतः तरुणांमध्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये मानसिक तणावाचे प्रमाण वाढत आहे. मानसिक आरोग्याविषयी समाजात अजूनही गैरसमज आणि भीती आहे. त्यामुळे मानसिक समस्यांबाबत खुलेपणाने चर्चा करणे, समुपदेशनाची सुविधा उपलब्ध करणे आणि मानसिक आरोग्याला तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

पर्यावरण आणि आरोग्य यांचा अतूट संबंध आहे. हवा, पाणी आणि अन्न यांची गुणवत्ता थेट आरोग्यावर परिणाम करते. प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार, त्वचेचे आजार आणि इतर अनेक समस्या निर्माण होतात. जलप्रदूषणामुळे पाण्याद्वारे पसरणारे आजार वाढतात. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ नैसर्गिक जबाबदारी नसून आरोग्याचे रक्षण करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

कोविड-१९ महामारीने संपूर्ण जगाला आरोग्य व्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करून दिले. या महामारीने आरोग्यसेवेतील कमतरता, संसाधनांची कमतरता आणि आरोग्यविषयक असमानता उघड केली. त्याचबरोबर स्वच्छता, मास्क, लसीकरण आणि सामाजिक अंतर यांचे महत्त्वही लोकांना समजले. या अनुभवातून शिकून आरोग्य व्यवस्थेला अधिक मजबूत करणे आवश्यक आहे.

शासनाच्या विविध आरोग्य योजनांमुळे आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, लसीकरण मोहिमा, पोषण आहार योजना यामुळे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे. तथापि, या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता आणि जनजागृती आवश्यक आहे.

आरोग्य शिक्षण हा आरोग्य सुधारण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. लोकांना योग्य माहिती दिल्यास ते स्वतःच्या आरोग्याची काळजी घेऊ शकतात. स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग, ध्यान, व्यसनमुक्ती यांसारख्या गोष्टींचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि समाजातील विविध घटकांनी यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

आयुर्वेद, योग, नैसर्गिक चिकित्सा यांसारख्या पारंपरिक पद्धतींचाही आरोग्य सुधारण्यात महत्त्वाचा वाटा आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रासोबत या पद्धतींचा समन्वय साधल्यास अधिक प्रभावी आरोग्यसेवा देता येऊ शकते. विशेषतः योग आणि ध्यान यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत होते.

आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही व्यक्तीला आर्थिक किंवा सामाजिक कारणांमुळे आरोग्यसेवा नाकारली जाऊ नये. 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी शासन, समाज आणि व्यक्ती यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

जागतिक आरोग्य दिन हा आपल्याला आपल्या जीवनशैलीचा पुनर्विचार करण्याची संधी देतो. आपण आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करून मोठे परिणाम साधू शकतो. संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताणतणावाचे व्यवस्थापन, स्वच्छता आणि सकारात्मक विचार या गोष्टींचा अंगीकार केल्यास आपण सुदृढ जीवन जगू शकतो.

शेवटी, आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. पैसा, प्रतिष्ठा, यश या सर्व गोष्टी आरोग्याच्या पुढे गौण आहेत. म्हणूनच प्रत्येकाने आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घ्यावी आणि समाजातही आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करावी. 'सुदृढ व्यक्ती-सुदृढ समाज-सुदृढ राष्ट्र' ही संकल्पना साकार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे हीच जागतिक आरोग्य दिनाची खरी भावना आहे.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# अनधिकृत गोडाऊनची 'शिळ' दिव्याच्या विकासाला खीळ

## अनधिकृत गोडाऊनला पालिकेकडून सर्व सुविधा पुरवल्या जातात










**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, दिवा (ठाणे) :** ठाणे महानगरपालिका क्षेत्रात, विशेषतः दिवा-शिळ रस्ता, भारत गिअर ते शिळ-डायघर पोलीस स्टेशन आणि दिवा ब्रिज ते शिळफाटा या परिसरात गेल्या काही वर्षांत अनधिकृत गोडाऊनचे पेव फुटले आहे. २०२१ ते २०२६ या प्रशासकीय राजवटीच्या काळात या अनधिकृत बांधकामांमध्ये प्रचंड वाढ झाली असून, यामुळे शहराच्या नियोजनबद्ध विकासाला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. शिवसेना नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील यांनी या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. नगरसेवक बाबाजी पाटील यांनी मीडियावर अशी ही माहिती दिली आहे.

एका गोदाऊन ला अडीच लाख रुपये हा कर लागू शकतो. त्यापेक्षा जास्त ही असू शकतो. या भागामध्ये हजारोच्या संख्येने अनधिकृत गोडाऊन उभे राहिल्यामुळे ठाणे महानगरपालिकेचे २० ते ४० कोट्यावधीचा हा कर डुबला जात आहे. एक तर पालिकेने यांच्यावर कारवाई करावी नाहीतर कर वसूल करावा. जर पालिकेने परवानगी दिली नाही तर पालिकेच्या सुविधा अनधिकृत गोडाऊनला मिळतात कशा हाही एक प्रश्न नागरिकांसमोर उभा राहत आहे.

अनधिकृत गोडाऊन मध्ये भंगार, प्लास्टिक, केमिकल साठे ठेवत असल्यामुळे या भागात प्रचंड अनधिकृत गोडाऊनला आग लागण्याचे प्रमाण वाढले आहेत. तसेच थोड्या दिवसात त पावसाला सुरू होणार आहे त्यामुळे रोगराई ही वाढण्याची शक्यता आहे. या अनधिकृत गोडाऊन बांधकामांमध्ये प्रचंड वाढ झाली असून, यामुळे शहराच्या नियोजनबद्ध विकासाला मोठा अडथळा निर्माण झाला आहे. ठाणे आयुक्त आणि दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त यांना पत्र सुद्धा दिला आहे. अशी माहिती नगरसेवक बाबाजी पाटील यांनी लोकमत मीडियाला दिली होती.

**महापालिकेचे कोट्यवधींचा आर्थिक नुकसान**

दिवा प्रभागात हजारोच्या संख्येने पत्र्याची मोठी गोडाऊन उभी राहिली आहेत. ही बांधकामे करताना महानगरपालिकेची कोणतीही अधिकृत परवानगी घेतली नसल्यास यामुळे पालिकेचे मोठ्या प्रमाणात आर्थिक




नुकसान होऊ शकते. या गोडाऊनमधून कोणत्या प्रकारचे व्यवसाय चालतात, याची कोणतीही नोंद प्रशासनाकडे नाही. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यांना व्यावसायिक 'मालमत्ता कर' भरावा लागतो का याची माहिती पालिका प्रशासनाने अद्याप संबंधित लोकप्रतिनिधींना दिलेली नाही. यामुळे महानगरपालिकेच्या तिजोरीवर मोठा दरोडा पडत असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. उत्पन्नाचा हा मोठा स्रोत अनधिकृत धंद्यांमुळे आटला आहे.

**असुरक्षितता आणि**

**आगीचा धोका :**

या पत्र्याच्या शेडमध्ये ज्वलनशील पदार्थांची साठवणूक किंवा अनधिकृत कारखाने चालवले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. नियोजनशून्य पद्धतीने बांधलेली ही गोडाऊन आगीच्या घटनांना निमंत्रण देत आहेत.

**अग्निशमन दलाला अडथळा :**

अरुंद रस्ते आणि दाटीवाटीने झालेली ही बांधकामे यामुळे आगीसारखी दुर्घटना घडल्यास अग्निशमन दलाच्या गाड्या पोहचणे कठीण होते.

सुरक्षेचा अभाव :कोणत्याही 'फायर ऑडिट'शिवाय चालणाऱ्या या गोडाऊनमुळे आजूबाजूच्या निवासी क्षेत्रालाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

**स्वच्छ व सुंदर शहराच्या क्रमवारीत घसरणीची भीती :**

ठाणे शहराने स्वच्छतेच्या बाबतीत ३५ व्या क्रमांकावरून १५ व्या क्रमांकापर्यंत मजल मारली आहे. मात्र, दिवा परिसरातील हे अनियंत्रित आणि विद्रुप पत्र्याचे साम्राज्य शहराच्या सौंदर्याला बाधा आणत आहे. जर या अनधिकृत बांधकामांवर वेळीच कारवाई झाली नाही, तर शहराच्या क्रमवारीत पुन्हा घसरण होण्याची भीती नगरसेवक बाबाजी पाटील यांनी याआधीच व्यक्त केली आहे.

**प्रशासकीय उदासीनता?**

नगरसेविका अर्चना पाटील यांनी १६ मार्च २०२६ रोजी या संदर्भात सहाय्यक आयुक्तांना पत्र दिले होते मात्र त्यावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

**पुढील आव्हाने आणि मागणी :-**

शहराच्या शाश्वत विकासासाठी ही अनधिकृत गोडाऊन जमीनदोस्त करणे आवश्यक आहे.

१. या गोडाऊनची संपूर्ण माहिती लेखी स्वरूपात जाहीर करावी.

२. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी.

३. थकीत मालमत्ता कराची वसुली करून बेकायदेशीर बांधकामांवर त्वरित बुलडोझर चालवावा.

शिळ विभाग व दिवेकरांच्या हितासाठी आणि शहराचा 'स्मार्ट' दर्जा टिकवण्यासाठी महापालिका आयुक्त यावर काय पाऊल उचलतात, याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

प्रशासनाने हा विषय गांभीर्याने घ्यावा. इतके दिवस चालढकल का केली जाते हेच कळत नाही.या ठिकाणी व्यवसाय करणारे स्थानिक नसून बहुतांश हे बाहेरून आलेले आहेत. त्यात बांगलादेशी ही असू शकतात.

शहराच्या भविष्यासाठी ही गंभीर बाब असून तात्काळ अनधिकृत व बेकायदा गोडाऊन बाबत पालिका आयुक्तांनी सहाय्यक आयुक्तांना निर्देश द्यावेत अशी नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना पाटील यांची मागणी आहे.

---

## माथेरानमध्ये दिव्यांग निधी वाटप व आर्थिक लाभ वितरण कार्यक्रम संपन्न



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०७, माथेरान :** माथेरान गिरिस्थान नगर परिषदेमार्फत दिव्यांग कल्याणकारी योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी आयोजित करण्यात आलेला निधी वाटप व लाभ वितरण कार्यक्रम मंगळवार, दि.०७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी कम्युनिटी सेंटर हॉल येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत लाभार्थ्यांना पारदर्शकतेच्या दृष्टीने थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये रक्कम जमा करण्यात आली. यामध्ये पहिल्या टप्प्यात प्रत्येकी ८ हजार रुपयांचे वितरण करण्यात आले असून, वर्षभरात एकूण १६ हजार रुपये देण्याची तरतूद आहे. नगर परिषदेकडील राखीव निधीतील ५ टक्के उत्पन्न दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी वापरण्यात येत असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमास मुख्याधिकारी राहुल इंगळे, दिव्यांग समिती सभापती रिजवाना शेख, मानव सेवा दिव्यांग कल्याणकारी संस्था अध्यक्ष चंद्रकांत जाधव, तसेच नगरसेवक व नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निधीच्या माध्यमातून दिव्यांग लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल, तसेच आरोग्य विमा काढल्यास भविष्यातील वैद्यकीय खर्च भागविण्यासही हातभार लागणार आहे. सध्या माथेरानमध्ये सुमारे ४० दिव्यांग नागरिक असून, त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी स्थानिक स्तरावर सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. मानव सेवा दिव्यांग कल्याणकारी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत जाधव हे दिव्यांग बांधवांना वेळोवेळी मदत करत असून, नगरपरिषद दिव्यांग समिती सभापती रिजवाना शेख या देखील शासनाच्या विविध योजनांचा लाभ अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

---

## झरीजवळ कारच्या धडकेत बहिण-भावाचा जागीच मृत्यू




**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०७, परभणी :** परभणी ते जिंतूर या महामार्गावर झरी जवळ कालव्यालगत मंगळवार, दिनांक ०७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी घडलेल्या भीषण अपघातात मोटारसायकलवरील दोघा बहिण-भावाचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच ३८ टी २२३१ क्रमांकाच्या मोटारसायकलवर सेनगाव तालुक्यातील वटकळी येथील राम महादेव व्यवहारे व शितल महादेव व्यवहारे हे दोघे बहिण-भाऊ परभणीहून जिंतूरकडे जात होते. दरम्यान, जिंतूरहून झरीकडे जाणाऱ्या एचआर २६ डीएफ ७८९० क्रमांकाच्या भरधाव कार चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने कारने मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघा बहिण-भावाचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. या अपघातामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी पुढील तपास संबंधित पोलिसांकडून सुरू आहे.

---

## कवठा - म्हसाळा येथे आरोग्य संपन्न गाव अभियानाला सुरुवात

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०७, कामठी (नागपूर) :** कामठी तालुक्यातील कवठा - म्हसाळा गट ग्रामपंचायतच्या वतीने कवठा-म्हसाळा गावात आरोग्य मंत्र्यांच्या आदेशानुसार माझे गाव, आरोग्य संपन्न गाव या अभियानाची सरपंच निलेश डफरे यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरित्या सुरुवात करण्यात आली आहे.

कवठा - म्हसाळा गट ग्रामपंचायतचे सरपंच निलेश डफरे यांनी विशेष ग्रामसभाचे आयोजन करून माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियानाची योग्य माहिती, उद्देश व अभियानाचे लाभ समजावून सांगितले. नुकताच गावाला राज्य शासनाकडून २५ लाख रुपयाचा पुरस्कार मिळाला, त्या पुरास्काराच्या रकमेतून गावात विविध विकास कामासाठी उपयोगात आणण्यात येणार असल्याची माहिती गावकऱ्यांना दिली. गावकऱ्यांनी माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियान गावात यशस्वीरित्या राबविण्यासाठी सहकार्य करणार असल्याची हमी दिली.




तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत गावात आरोग्य शिबिराचे आयोजन करून दवाखाना आपल्या दारी या अभियाना मार्फत आरोग्याच्या लहान मोठे सर्व उपचार गावात होणार असल्यामुळे माझे गाव आरोग्य संपन्न गाव अभियान वरदान ठरणार आहे. अभियाना मध्ये गावकरी, ग्राम पंचायत आशा वर्कर, अंगणवाडी, शिक्षिका तसेच बचत गटामार्फत स्वच्छता अभियान राबवून गावाला स्वच्छ व सुंदर करून आरोग्य मुक्त गाव करण्याचा निर्धार करण्यात आला.

ग्राम सभेला गावातील सरपंच निलेश डफरे, उपसरपंच रविंद्र कुहिटे, सचिव निळकंठ देवगडे, सदस्य संदीप मेंढे, जेष्ठ नागरिक रघुनाथ इरखेडे, वासुदेव ठाकरे, भगवान ठाकरे, पंजाबराव खाडे, दिवाकर सोनटक्के, उद्धव कुहीटे, शेखर सोनटक्के, सुरेश करमरकर, इंदिरा सोनटक्के, मंगला इरखेडे, छाया आडे, मीरा इरखेडे, शारदा सोनटक्के, जिजा निगुट, मंगेश इरखेडे, गोलू इरखेडे, मयूर निगुट, मयूर साबळे सहित मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते.

---

## राहुरी विधानसभा पोटनिवडणूक; २३ उमेदवारांचे अर्ज वैध; बहुरंगी लढतीची रंगत वाढली

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०७, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आज पार पडलेल्या अर्ज छाननी प्रक्रियेत एकूण २३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून ५ उमेदवारांचे अर्ज विविध तांत्रिक व कागदपत्रीय कारणांमुळे बाद करण्यात आले आहेत. त्यामुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय चित्र आता अधिक स्पष्ट झाले असून आगामी काळात प्रचाराला अधिक वेग येणार आहे.

छाननी प्रक्रियेनंतर निवडणूक रिंगणात उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी समोर आल्याने मतदारांमध्ये ही उत्सुकता वाढली आहे.वैध ठरलेल्या उमेदवारांमध्ये राष्ट्रीय व राज्यस्तरीय मान्यता प्राप्त राजकीय पक्षांचे केवळ दोन उमेदवार असून उर्वरित तब्बल २१ उमेदवार हे अपक्ष किंवा इतर पक्ष - संघटनांचे आहेत. त्यामुळे या पोटनिवडणुकीत पारंपरिक दोन पक्षांपुरती मर्यादित लढत न राहता बहुकोनी संघर्ष पाहायला मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भारतीय जनता पक्षाचे अक्षय शिवाजीराव कर्डिले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) चे मोकाटे गोविंद खंडू हे प्रमुख पक्षांचे उमेदवार असताना, वंचित बहुजन आघाडीचे चोळके संतोष एकनाथ यांचाही समावेश या निवडणुकीत महत्त्वाचा मानला जात आहे.

याशिवाय मोठ्या संख्येने अपक्ष उमेदवार निवडणूक रिंगणात उतरल्यामुळे मतांचे विभाजन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अर्थव साहेबराव म्हसे, अनिल भिकाजी जाधव, अल्ताफ इब्राहिम शेख, कोळसे बाळू बाबुराव, जाधव नागेश विलास, जाधव बाळासाहेब सोमा, देशमुख इम्रान नबी, धोंडे संभाजी लक्ष्मण, पवार नामदेव बंडू, प्रतिमा किशोर देसर्डा, प्रवीण सुभाष दळवी, बर्डे साखहरी शांताराम, बिलाल गफूर शेख, मोरे रविंद्र बापूसाहेब, रावसाहेब सदाशिव खेवरे, शितोळे सुदर्शन शांताबाई लक्ष्मण, शेटे सविता रामचंद्र, साहेबराव पाटीलबा म्हसे, सूर्यभान दत्तात्रय लांबे आणि हापसे महेश केशव हे अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात आहेत.

दरम्यान, अर्ज माघारीची अंतिम मुदत संपल्यानंतर प्रत्यक्ष लढतीचे चित्र आणखी स्पष्ट होणार असले तरी सध्याच्या घडीला २३ उमेदवार रिंगणात असल्यामुळे राहुरी विधानसभा मतदारसंघात चुरशीची, बहुपक्षीय आणि अनिश्चिततेची लढत होण्याची चिन्हे दिसत आहेत. विविध राजकीय पक्ष, स्थानिक गट-तट आणि अपक्ष उमेदवार यांच्या उपस्थितीमुळे प्रचाराची रंगत वाढणार असून मतदारांना अनेक पर्याय उपलब्ध झाल्याने या निवडणुकीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## दिवा शहरात स्वच्छतेचा बोजवारा सफाई कामगार वाढवण्याची मागणी

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील प्रभाग क्रमांक २७ आणि २८ मध्ये अस्वच्छतेचा प्रश्न तीव्र झाला असून मुख्य रस्त्यांसह अंतर्गत भागांतही कचऱ्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या दिवा शहर महिला संघटनेच्या पदाधिकारी ज्योती पाटील यांनी महापालिका प्रशासनाकडे सफाई कामगारांची संख्या वाढवण्याची मागणी केली आहे.



स्थानिक नागरिकांच्या मते, शहरातील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांची नियमित आणि समाधानकारक साफसफाई होत नसल्याचे चित्र आहे. विशेषतः फुटपाथ, रस्त्यांच्या कडेला तसेच मोकळ्या जागांमध्ये कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत असून त्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढली आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

माहितीनुसार, सिमेंट काँक्रीटचे रस्ते आणि मुख्य मार्गांच्या कडेला असलेल्या जागांची दररोज सकाळी साफसफाई होणे अपेक्षित आहे. मात्र, उपलब्ध सफाई कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याने हे काम प्रभावीपणे पार पडत नसल्याचे स्पष्ट होत आहे. या संदर्भात ज्योती पाटील यांनी प्रशासनाला तातडीने अतिरिक्त सफाई कामगारांची नियुक्ती करून दररोज नियमित साफसफाई सुनिश्चित करण्याचे आवाहन केले आहे. या मागणीवर म हापालिका प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे दिवा शहरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## मोहोळ तालुक्यात अवकाळीमुळे झालेल्या नुकसानीचे त्वरित पंचनामे करा - प्रभाकर देशमुख

### अन्यथा तहसील समोर १५ एप्रिलपासून बोंबाबोंब आंदोलन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०७, पंढरपूर :** मोहोळ तालुक्याम ध्ये गेल्या १० दिवसा खाली भयानक चक्रीवादळामुळे व अवकाळी पाऊस तसेच गारपिटीमुळे पेनुर कोन्हेरी येवती खंडाळी पापरी देवडी हिवरे व इतर ज्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या पिकांचे फळबागांचे व घरांचे नुकसान झालेले आहे. त्याचे त्वरित पंचनामे करा. या मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर भैय्या देशमुख यांचे नेतृत्वाखाली मा मोहोळ तहसीलदार यांना देऊन म ागणी करण्यात आले असल्याचे प्रभाकर देशमुख यांनी बोलताना सांगितले निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री पालकमंत्री



कृषी मंत्री महसूल मंत्री यांना पाठवलेल्या आहेत पुढे बोलताना देशमुख म्हणाले की मोहोळ तालुक्यामध्ये दहा ते बारा दिवसांपूर्वी भयानक चक्रीवादळामुळे व अवकाळी व गारपिटीमुळे बारा गावच्या शेतकऱ्यांचं सर्वसामान्य नागरिकांचं ३ कोटी २८ लाख रुपये नुकसान झालेलं आहे. याबाबतीत आमदार राजाभाऊ खरे व खासदार ज्योतीताई वाघमारे आणि मनसेचे युवा नेते अमित ठाकरे साहेब यांनी व इतर अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष वस्तुस्थितीची पाहणी करून शेतकऱ्यांना सर्वसामान्य नागरिकांना आधार दिला आहे.

परंतु राज्य शासनाकडून आदेश नसल्यामुळे अद्याप पंचनामे केलेले नाहीत त्यामुळे त्वरित सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी यात लक्ष घालून पंचनामेचे आदेश द्यावेत आणि शेतकऱ्यांचे उध्वस्त झालेले प्रपंच सुरळीत करावे व त्यांची नुकसान भरपाई द्यावी. तसेच २०२४ - २५ व २५ - २६ ला झालेल्या पुरामध्ये व चक्रीवादळाम ध्ये सोहाळे वडवळ व इतर गाव गावचे पंचनामे झालेले असताना त्यांची नुकसान भरपाई मिळेल नाही की त्वरित त्यांच्या खात्यावर जमा करावी निवेदनामध्ये असं नमूद केलेलं आहे. पिकांची हेक्टरी ७० हजार रुपये व फळ बागेची एक लाख रुपये आणि घराची पडझड झालेल्यांना एक लाख रुपये त्वरित द्यावेत. अशी मागणी ही देशमुख यांनी लावून धरलेली आहे.

यावेळी नाना मोरे, गणेश चवरे, पिंटू पवार, शिवाजी जाधव, मानाजी चवरे, हरिभाऊ लोंढे, तानाजी मुळे, हनुमंत भोसले इत्यादी कार्यकर्ते शेतकरी उपस्थित होते.

## नगराध्यक्षा यांच्या पुढाकारातून ४९ लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हफ्ता; कुंडलवाडीत स्वप्नपूर्तीची नवी सुरुवात

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०६, कुंडलवाडी (नांदेड) :** नगर परिषद हद्दीतील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत लाभार्थ्यांसाठी पहिला हफ्ता वितरण सोहळा उत्साहात पार पडला. दि.०६ एप्रिल २०२६ रोजी नगर परिषद कार्यालयात आयोजित या कार्यक्रमात ४९ लाभार्थ्यांना प्रत्येकी एक लाख रुपयांचा पहिला हफ्ता वितरित करण्यात आला. हा निधी केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त माध्यमातून देण्यात आला आहे.

या प्रसंगी नगराध्यक्षा प्रेरणाताई गजानन कोटलावार यांनी माहिती देताना सांगितले की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत कुंडलवाडी नगर परिषद हद्दीतील आणखी ११४ नवीन घरकुलांना मंजुरी केंद्र शासनाकडून प्राप्त झाली




आहे. त्यामुळे शहरातील अनेक गरजू कुटुंबांचे स्वतः च्या घराचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार आहे.

तसेच आतापर्यंत ऑनलाइन नोंदणी करून मंजूर झालेल्या एकूण २२० लाभार्थ्यांना नगर परिषदेकडून आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी नगर परिषद कार्यालयातून आवश्यक बांधकाम परवानगी घेऊन तात्काळ घरबांधणीस सुरुवात करावी व पहिला हफ्ता मिळविण्यासाठी अर्ज सादर करावा.

दरम्यान, इच्छुक नवीन लाभार्थ्यांनी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत अधिकृत वेब पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज नगर परिषद कार्यालयात सादर करावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी प्रधानमंत्री आवास योजना कक्ष, नगर परिषद कुंडलवाडी येथे संपर्क साधावा. नगर परिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या या योजनेमुळे शहरातील सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घर मिळविण्याचा मार्ग अधिक सुलभ होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर येथे आर्थिक साक्षरता कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.०७, चिमूर (चंद्रपूर) :** ग्रामगीता महाविद्यालय, चिमूर येथे आर्थिक साक्षरता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ग्रामगीता महाविद्यालय, चिमूरच्या आयक्यूएसी आणि करिअर काउंसिलिंग व प्लेसमेंट सेलने, नॅशनल सेंटर फॉर फायनान्शियल एज्युकेशन (NCFE) च्या सहकार्याने, बचत, गुंतवणूक आणि जबाबदार आर्थिक नियोजनाविषयी व्यावहारिक ज्ञान देऊन विद्यार्थी आणि शिक्षकांना सक्षम करण्यासाठी नुकतेच आर्थिक साक्षरतेवर कार्यशाळेचे आयोजन केले. हा उपक्रम संपूर्ण भारतात आर्थिक जागरूकता निर्माण करण्याच्या NCFE च्या देशव्यापी मोहिमेचा एक भाग आहे. या कार्यक्रमासाठी, सेबीचे सिक्युरिटीज मार्केट ट्रेनर सागर आर.तवर हे मूलभूत आर्थिक नियोजन आणि अर्थसंकल्प, बचतीचे महत्त्व आणि शिस्तबद्ध गुंतवणुकीच्या सवयी यांबद्दल मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना फसवणूक प्रतिबंध आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांबद्दल ही माहिती दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा, प्राचार्य डॉ.सुनीता एस.आस्वले म्हणाल्या की, ग्रामीण तरुणांमध्ये आर्थिक साक्षरतेचा प्रसार करणे आणि वैयक्तिक वित्ताविषयी लहान वयातच जागरूकता निर्माण करणे, हा या कार्यक्रमाच्या आयोजनाचा उद्देश आहे. डॉ.मृणाल वऱ्हाडे यांनी कार्यक्रमाचे संचालन करून कार्यक्रमाची



ओळख करून दिली, डॉ.निलेश ठवकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## बोंडारवाडी धरण ट्रायलपीटसाठी ५४ गावांचे ३ गावांना साकडं

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०७, सातारा :** जावली बोंडारवाडी धरण प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या ट्रायलपीट प्रक्रियेवरून परिसरात निर्माण झालेला तणाव अद्याप कायम असून, धरणाचा लाभ होणाऱ्या ५४ गावांनी बाधित ठरणाऱ्या ३ गावांना ट्रायलपीटसाठी सहकार्य करण्याचे साकडं घातले आहे. ट्रायलपीट रखडल्यामुळे प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, ट्रायलपीट ही कोणत्याही धरण प्रकल्पातील प्राथमिक व तांत्रिक प्रक्रिया असून, या टप्प्यावर जमिनीची रचना, खडकांची गुणवत्ता, पाण्याचा प्रवाह, तसेच धरणासाठी योग्य जागा निश्चित करण्यास मदत होते. म्हणजेच, ट्रायलपीट ही अंतिम निर्णय प्रक्रिया नसून माहिती गोळा करण्याची आणि तांत्रिक पडताळणी करण्याची प्रक्रिया आहे.याच पार्श्वभूमीवर काही नागरिकांनी म ांडलेला मुद्दा लक्षवेधी ठरत आहे. ट्रायलपीट झाली म्हणजे धरण होणारच आणि आमचं नुकसान ठरलेलं आहे, अशी भीती बाधित गावांमध्ये व्यक्त केली जात आहे. मात्र तांत्रिकदृष्ट्या हा समज पूर्णतः अचूक नसल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत. कारण, ट्रायलपीटमधून मिळालेल्या अहवालावरच पुढील निर्णय अवलंबून असतो. जर जागा तांत्रिकदृष्ट्या अयोग्य ठरली, तर प्रकल्पात बदल, स्थलांतर किंवा फेरविचार करण्याचा ही पर्याय असतो. त्यामुळे ट्रायलपीट म्हणजे अंतिम मंजुरी नसून, निर्णय घेण्याआधीचा अत्यंत महत्त्वाचा अभ्यास टप्पा आहे. दरम्यान, ५४ गावांमधून असा सवाल उपस्थित केला जात आहे की, ट्रायलपीटलाच विरोध केल्यामुळे काहीच स्पष्ट होत नाही.धरण नेमकं कुठे होणार, कोणत आणि किती क्षेत्र बाधित होणार,कोणाच किती नुकसान होणार,हेच कळत नाही. मग भीती आणि विरोध नेमका कशावर आधारित आहे? काहींनी याला माहिती मिळू न देण्याचा प्रयत्न असेही म्हटले आहे.दुसरीकडे, बाधित गावांचा प्रश्न ही तितकाच महत्त्वाचा असून, त्यांना योग्य भरपाई, पुनर्वसन आणि पारदर्शक माहिती मिळणं गरजेचं असल्याचं मत व्यक्त होत आहे. 'आधी पुनर्वसन मग धरण' हा कायदा, सरकारी धोरण आहे. त्यामुळे संवादातून विश्वास निर्माण करणं ही शासन,प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारी असल्याचाही मतप्रवाह आहे. एकूणच, ट्रायलपीट ही प्रकल्पाचा पाया असलेली तांत्रिक प्रक्रिया असून, त्यालाच विरोध झाल्यास संपूर्ण प्रकल्प अनिश्चिततेत जात आहे. त्यामुळे भीती आणि गैरसमज दूर करून, वस्तुस्थिती समोर येण्यासाठी तीन गावांनी ट्रायलपीट प्रक्रियेला सहकार्य करण्याची गरज व्यक्त होत आहे. नाहीतर एवढी वर्षे रखडलेला हा विकास प्रकल्प अफवांवर उभा आहे की काय अशी मांडणी होईल. ट्रायलपीट रोखून ठेवणं म्हणजे लोकांना मुद्दाम अंधारात ठेवणं आणि मग त्याच अंधारात विरोधाचं राजकारण करणं हा राजकीय खेळ होऊ नये अशी अपेक्षा सामान्य नागरीकांची आहे.

## थोडक्यात

### खापरखेडा येथे भाजपा स्थापना दिवस मिठाई वाटून साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०७, नागपूर :** भारतीय जनता पक्षाच्या ४६ व्या स्थापना दिनानिमित्त खापरखेडा येथील मुख्यमार्गावरील भाजपा कार्यालयात मिठाई वाटून पक्ष स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी पक्ष



कार्यालयासमोर पक्षाचा ध्वज फडकवण्यात आला. भारत मातेच्या पूजेने आणि 'भारत माता की जय'च्या गजरात या कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी कार्यकर्त्यांचा उत्साह आणि 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो'च्या घोषणांनी परिसर ऊर्जेने भरून गेला होता. यावेळी एकात्म मानवतावादाचे जनक पंडित दीनदयाल उपाध्याय, माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी आणि ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांच्या योगदानावर समयोचीत भाषणे झाली. या सोहळ्याला पक्षाचे ज्येष्ठ नेते रमेशचंद्र जैन, राधाकिसन मित्तल, सुनील जालंदर, शामराव सरोदे, चंद्रशेखर पानतावणे, बळी गायकवाड, श्रीराम डाखले, गिरधारी शर्मा, ताराचंद फटिंग, अभय मिश्रा, लक्ष्मण खडसे, विकास शिंदे, जय तिवारी आदीसह अन्य पदाधिकारी आणि समर्पित कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यकर्त्यांचा उत्साह आणि 'भारतीय जनता पार्टीचा विजय असो'च्या घोषणांनी परिसर ऊर्जेने भरून गेला होता.

### मंडणगडच्या अर्थव हलगवार ला बाल वैज्ञानिक बनण्याचा मान




**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.०७, दापोली (रत्नागिरी) :** मुंबई विज्ञान शिक्षक असोसिएशनच्या माध्यमातून नुकताच घेण्यात आलेल्या होमी भाभा बाल वैज्ञानिक परिक्षेत मंडणगड येथील अर्थव जयराम हलगवार याने रौप्य पदक पटकावित बाल वैज्ञानिक होण्याचा मान मिळवून तालुक्यांचा लौकिक वाढला आहे. कोल्हापूर विभागातील चार जिल्ह्यातील केवळ अकरा विद्यार्थ्यांची मुलाखतीकरिता निवड झाली होती. परिक्षेत अर्थव याने मंडणगड तालुक्याचा जिव्हाळ्याचा विषय असलेल्या पर्यावरण पूरक गौण खनिज उत्खनंन या विषयावर सखोल अभ्यासात्मक प्रतिकृती सादर केली व सिलव्हर मेडल मिळाले. सध्या रोटरी स्कूल खेड येथे शिक्षण घेत असलेल्या अर्थव याने संगीत, कला, क्रीडा, नृत्य, वादन व शाळेचा नैमित्तीक अभ्यास यात उत्तम प्रगती करीत आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाची चणूक यापूर्वी दाखवली आहे. मुंबईतील यशवंत नाट्यमंदिर माटुंगा येथे झालेल्या कार्यक्रमात त्याला सन्मानीत करण्यात आले त्यास प्रशालेच्या मुख्याध्यापिका भूमिता पटेल, शिक्षका दीपाली दरेकर, तेजश्री क्षीरसागर, तनुजा चव्हाण, राहूल चव्हाण, प्रसाद सावंत, वैष्णवी धुमाळ प्राजक्ता गावडे ग्रंथपाल सिध्दी दामले यांचे मार्दगर्शन मिळाले त्याने मिळवीलेल्या या यशाबद्दल तालुक्यातून सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन करण्यात येत असून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छाही देण्यात येत आहेत.

### जागतिक आरोग्य दिनी 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' मोहिमेला वेग

#### चिचोलीत आरोग्य जनजागृती शिबिर; विविध आजारांवर मार्गदर्शन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०७, नागपूर :** जागतिक आरोग्य दिनानिमित्त मंगळवार, ७ एप्रिल रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र, चिचोली यांच्या वतीने वार्ड क्रमांक १ येथे 'माझे गाव,



आरोग्य संपन्न गाव' या मोहिमेअंतर्गत जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला सरपंच मीनाक्षीताई तागडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. दरम्यान प्राथमिक आरोग्य केन्द्राचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ.जयश्री पेटकर, डॉ.दीपक तरार व डॉ.अश्विनी शेरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात गावकऱ्यांना विविध आरोग्य विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली. १ एप्रिल २०२६ पासून सुरू करण्यात आलेल्या या मोहिमेचा उद्देश गावातील नागरिकांचे आरोग्य उंचावणे हा असून, त्यादृष्टीने विविध उपक्रम राबवले जात आहेत.यावेळी नागरिकांची बीपी, शुगर तपासणी करण्यात आली तसेच सिकलसेल, क्षयरोग व कुष्ठरोग यांसारख्या आजारांबाबत जनजागृती करण्यात आली. आरोग्यदायी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देत आजारांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. तसेच, एचपीव्ही लसीकरणाबाबत विशेष मार्गदर्शन करत १४ ते १५ वर्षे वयोगटातील मुलींनी ही लस घेणे गरजेचे असल्याचे सांगण्यात आले. महिलांमध्ये होणाऱ्या कॅन्सरपासून संरक्षणासाठी ही लस प्रभावी ठरते, असेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आरोग्य सहाय्यक टेकाडे, धनंजय ढोके, आरोग्य सहाय्यिका नागदेवे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ प्रदीप जांभुळकर, आरोग्य सेवक गौतम खोब्रागडे, गौरीशंकर मुंडले, आदित्य हाडके, संदीप ढुमणे, स्वप्नील ढाले, बालपांडे, यशवंत घोटेकर, शरद पवार तसेच आरोग्य सेविका कविता शेंडे, वैशाली लोहकरे, अश्विनी पावडे, तारा नायडू, सारिका काकडे व इतर आशा कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

### पालम येथील हिंदू महासंमेलनास उपस्थित राहण्याचे आवाहन

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०७, पालम (परभणी) :** पालम शहरात प्रथमच समस्त हिंदू बांधवांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी गुरुवार, दिनांक ०९ एप्रिल २०२६ रोजी शहरातील महारुद्र मंदिर येथे सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या होणाऱ्या सभेला तालुक्यातील समस्त हिंदू बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान करण्यात आले आहे. हिंदू समाजामध्ये सामाजिक समरसता, सांस्कृतिक जागरूकता आणि राष्ट्रीय बांधिलकी दृष्ट करण्याच्या उद्देशाने भूमी व्यापक हिंदू संमेलन आयोजित करण्यात येत आहे. या संमेलनामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांचे समाज जागृतीसाठी व हिंदू समितीचे संघटन करण्याबाबत मार्गदर्शन होणार आहे. या संमेलनास हिंदू समाजातील सर्व बंधू भगिनींनी, युवक युवती, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास ह.भ.प.नारायण महाराज पालमकर, परमपूज्य दत्तराज बाबा कोटी, निलेश चंद्रकांत गद्रे, आदींची उपस्थिती लाभणार आहे. होणाऱ्या संमेलनास पालम तालुक्यातील समस्त हिंदु बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.